# गाँधी: विश्वस्ताची संकल्पना एक दृष्टिक्षेप

*प्रा. डॉ. सर्जेराव शिंदे

**शोधपत्र-राज्यशास्त्र**

महात्मा गांधीच्या सर्व विचारांचा आधार नैतिकता हा आहे. त्यामुळे काही बाबतीत त्यांचे विचार अव्यवहार्य व भोळेपणाचे वाटतात. त्यांची विश्वस्ताची कल्पना ही अशाच स्वरूपाची आहे. संपत्ती वरील मालकी नष्ट होवून समाजा मध्ये सुख व स्वास्थ्य नांदावे यासाठी गांधींनी विश्वस्त वृत्तीचा सलोख्याचा मार्ग शोधून काढला. समाजातील निरनिराळे कार्य करीत असतांना व्यक्तीने नफ्याच्या, सुखाच्या किंवा महत्वाकांक्षेच्या मागे लागून ती न करता कर्तव्य बुध्दीने करावीत. आणि समाजाने मालमत्ता, अधिकार, सत्ता, विव्दत्ता, ज्ञान, शारीरिक सामर्थ्य इत्यादी दिले असून त्या सर्वांचे आपण केवळ निधी धारक किंवा विश्वस्त आहोत असे मानून त्याचा उपयोग करावा. त्यामुळे समाजात हा मालक तो नोकर, हा मजूर तो महाजन, हा राबणारा, तो काम घेणारा, हा कष्ट करणारा, तो कष्टांची किंमत देणारा, हे माणसा-माणसांतील संबंध राहणार नाहीत. माणसा-माणसातील असे संबंध आपुलकीला विघातक असतात. सगळयांनी मिळून सुख व दु:ख, काम व आराम, श्रीमंती व गरीबी वाटून घ्यावी, असे गांधीजी म्हणतात. काम करणारा वेगळा व कामाचा हिशोब घेणारा वेगळा. एक मजूर व दुसरा मुकदम हे माणुसकीला मानवणारे नाही कारण कामावर देखरेख ठेवणारा व्यवस्थापक किंवा मॅनेजर होतो. व काम करणारा त्याचा ताबेदार बनतो. स्वातंत्र्याला मालकशाहीचे जसे वावडे आहे. तसेच व्यवस्थापक शाहीचे ही आहे.

गांधीजींनी ही संकल्पना ईशावास्योपनिषदा तील पहिल्या श्लोकातून स्विकारली आहे. या श्लोकाचा अर्थ असा की जगातील सर्व वस्तू जातीचा मालक ईश्वर आहे. सर्व वस्तू त्याला अर्पण करून (त्याच्या मालकीच्या आहेत असे समजून) संपत्तीचा उपभोग घ्या. कोणात्याही (स्वत:च्या सुध्दा) धनाचा लोभ धरू नये. याचीच प्रेरणा घेवून गांधींनी समाज सुखी व शोषणमुक्त बणवण्यासाठी विश्वस्ताचा सिध्दांत मांडला. गांधींनी 'विश्वस्त' हा त्यांच्या हिंद स्वराज्य और इंडियन होमरूल या पुस्तकात १९०९ मध्ये प्रथम वापरला असावा. ४ फेब्रुवारी १९१६ रोजी बनारस हिंदू विश्व विद्यालयाच्या उद्‌घाटन समारंभात भाषण करतांना व्यासपीठावरील उंची वस्त्रे व अलंकार यांनी मढलेल्या राजेरजवाड्यांना हे सर्व दागिने उतरवून भारतीय देशबांधवासांठी 'विश्व-ठेव' म्हणून त्यांचा विनीयोग करा. असे त्यांनी आवाहन केले. तसेच १९१० मध्ये मिठाच्या सत्याग्रहासाठी जात असतांना भरतीय स्वातंत्र्याबद्दल गांधी म्हणतात. 'ब्रिटीश राजवटीमुळे आपल्यात निर्माण झालेल्या ऐतद्देशिय श्रीमंत सटोकिये, भांडवलदार, जमीनदार, कारखानदार व तत्सम लोक यांच्या हितसंबंधाचा अहिंसेच्या मार्गात सर्वात मोठा अडथळा आहे. लोकांचे रक्त पिवून आपण जगत आहोत.

आपल्याच रक्ताचे लक्षावधी लोक अर्धपोटी जगत असताना आपण लक्षधिश, कोटयाधिश असणे गुन्हा आहे. ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत नलिनी पंडीत यांनी महात्मा गांधीजींची विश्वस्त वृत्तीची कल्पना स्पष्ट करताना "श्रमजीवी वर्गाचे शोषण थांबविण्यासाठी राष्ट्रीयकरणाला अहिंसक पर्याय म्हणून विश्वस्त वृत्तीची कल्पना मांडली" असे विचार आपल्या "गांधी" या ग्रंथात विशद केले आहेत. आपण एखाद-दुसऱ्याची वस्तू सांभाळायला ठेवली म्हणजे तिला दुसऱ्याची ठेव मानतो. मोठया कसोशीने ती सांभाळून ठेवतो. त्याच्याकडे वस्तू सांभाळायला ठेवली जाते. त्याचे नाव 'ट्रस्टी' म्हणजे 'विश्वस्त' भरवशाचा 'माणूस' सांभाळायला जो ऐवज दिला त्या वस्तूला ट्रस्ट म्हणतात. म्हणजे विश्वासाने ठेवलेली ठेव. तेंव्हा ठेवीदार किंवा ट्रस्टी हा झाला विश्वस्त आणि जी वस्तू ठेवून म्हणून दिली ती 'ट्रस्ट' ह्यालाच विश्वस्तयोग किंवा गांधीजींची ट्रस्टीशीप म्हणतात. गांधीजींच्या मते जी कांही संपत्ती आहे. ती सारी ईश्वराची आहे. ती मणुष्याला सर्वशक्तीमान ईश्वरापासून मिळालेली आहे. जगाच्या सेवेसाठी त्याचेकडे ती ईश्वराने सोपविलेली आहे. त्यामुळे कोणाही व्यक्तीजवळ स्वत:च्या गरजेपेक्षा अधिक मालमत्ता असेल तर ईश्वराच्या दीन-दु:खी संतानांच्या सेवेसाठी उपयोग करण्याकरिता त्याने त्या मालमत्तेचे विश्वस्त बनावे. आपण श्रीमंताना 'विश्वस्त' होण्यास सांगितले आहे. त्यांनी आपल्या मालमत्तेवरील खाजगी मालकी हक्क सोडून देवून एक कायदेशीर व लोकशाही पध्दतीने चालणारा ट्रस्ट निर्माण करावा असा अर्थ करावयाचा का ? असा अर्थ केल्यास सध्या अस्तित्वात असलेली व्यक्ती मृत्यू पावल्यावर हिचा उत्तराधिकारी कसा निवडला जाईल ? या प्रश्नाला उत्तर देताना गांधी म्हणाले "सर्व गोष्टी परमेश्वराने दिल्या असून त्यावर परमेश्वराची मालकी आहे. कोणतीही गोष्ट परमेश्वराच्या लेकरांच्या उपयोगासाठी असतो. कोण्या एका व्यक्तीच्या उपभोगासाठी ती नसते. जेंव्हा एखादया माणसाजवळ प्रमाणापेक्षा जास्त संपत्ती गोळा होते तेंव्हा तो त्या जादा भागापुरता लोंकातर्फे विश्वस्त ठरतो.

ईश्वर सर्वशक्तीमान असल्याने त्याला साठा करण्याची गरज नसते. आजचे - आज, उदयाचे - उदया अशी त्याची रित आहे.

* राज्यशास्त्र, संभाजी महाविद्यालय, मुरूड., लातूर

त्यामुळे खरे म्हणजे तत्वत: माणसानेही उद्याची चिंता करू नये. साठा करू नये. हे तत्व सामान्य लोकांच्या मनात बिंबले तर ते कायद्यात ग्रंथीत होईल. मग विश्वस्त या संस्थेलाही आपोआपच कायदेशीर अधिष्ठान लाभेल. विश्वस्त सिध्दांत ही भारताने जगाला दिलेली देणगी ठरावी अशी त्यांची इच्छा होती. सर्व जगाने या पध्दतीचा स्विकार केला तर कसलीच पिळवणूक राहणार नाही. गोऱ्या लोकांनी स्वत:साठी किंवा आपल्या भावी पिढ्यांसाठी आस्ट्रोलिया, कॅनडा किंवा तशाच दुसऱ्या देशात जमीन राखून ठेवण्याचे ही कारण उरणार नाही. या भेदभावाच्या उदरात दोन महायुध्दापेक्षा भयंकर युध्दाची बिजे आहेत. "उद्याची चिंता करू नका" ही आज्ञा जगातील बहुतेक सर्व धर्मग्रंथात निनांदत आहे. सुयंत्र समाजात कोणालाही आपला चरितार्थ चालवणे ही सोपी गोष्ट असली पाहीजे. आणि असते ही खरोखरच एखांदा देश सुव्यवस्थि आहे की नाही. याची कसोटी, त्यामधील लक्षाधिशांची संख्या ही नव्हे तर जनतेमध्ये उपासमार नसणे ही होय. समाजातील प्रत्येत घटकाने आपली सर्व बुध्दी केवळ स्वत:च्या भरभराटीसाठी नव्हे, तर सर्वांच्या कल्याणसाठी उपयोगात आणणे हे समाजाच्या सुस्थितीला पोषक नाही काय? आम्हाला समाजात स्मशान समता निर्माण करावयाची नाही. त्यामुळे प्रत्येक माणुस आपल्या अंगातील कर्तव्य शक्ती अधिकाधिक वापरण्यात अपात्र बनतो किंवा तसा केला जातो. असा समाज शेवटी नाशच पावतो. म्हणून श्रीमंत लोकांनी (अर्थात प्रमाणिक पणानेच) करोडो रूपये कमवावेत. पण सर्वांच्या उपयोगासाठी ते अर्पण करावेत. असा सल्ला गांधींनी '' 'Socialism of my Conception' मध्ये पा.न. २८३ वर १९४२ मध्ये दिला. गांधींनी विश्वस्तवृत्तीच्या आधारे देशातील भांडवलदार, जमिनदार किंवा व्यापारी नष्ट करावयाचा नव्हता, तर या देशातील किसान, कामगारांना खाण्यापुरते, राहण्यापुरते, कपडे घालण्यापुरते, स्वाभिमाणी मानव प्राणी म्हणून सर्व सामान्य सुखसोयीने जगण्यापुरते धन मिळावे ह्याहून गाधींची अधिक इच्छा नव्हती. अहमदाबाद येथील गिरणी कामगारांच्या संपाच्या प्रसंगी मालक व मजूर अखेर एकाच कुटूंबाचे घटक आहेत. कामगारांनी, कारखानदारांना पित्याच्या जागा कल्पून त्यांच्याकडे सवलतीची मागणी करावी. कारखनदारांनी कामगारांच्या कल्याणाची काळजी वाहवी. आाणि संपाचा मार्ग न चोखाळता दोघांनीही आपले तंटे सामंजस्याने व वाटाघाटीने सोडवावेत. अशी या तंट्यात गांधींनी भुमीका घेतली मात्र व चंपारण्य खेडा जिल्ह्या येथे इंग्रज जमिनदार व परकिय शासन यांच्याशी शेतकऱ्यांचा झगडा चालू होता.

दिल्ली येथे जुन्या कौन्सिलमध्ये 'हिंदी व्यापारी संघाच्या फेडरेशन' पुढे दि. ७ मार्च १९३१ रोजी केलेल्या भाषणात व्यापारी वर्गांनी देशाची जी विविध सेवा केली आहे. ती मी विसरू शकत नाही. पण तुम्ही आणखी एक पाऊल पुढे जावे. अशी माझी इच्छा आहे. तुम्ही काँग्रेस आपल्या ताब्यात घ्यावी असे मला वाटते. तिची सुत्रे आम्ही तुमच्या हाती आनंदाने देवू, तुम्ही आमच्यापेक्षा चांगली कामे कराल. मात्र तुम्ही स्वत:ला गरिबांची विश्वस्त व सेवक मानले पाहीजे. तुमचा व्यापार लाखो श्रमजिवी लोकांच्या कल्याणासाठी चालला पाहीजे असे सांगीतले. जमिनदार व कारखानदार लोकांच्या संपत्तीचे विश्वस्त म्हणून राहण्यास तयार होणार नाहीत. हे गाधींजीच्या हळूहळू लक्षात आले. परंतु त्यांनी आपले प्रयत्न बंद ठेवले नाहीत. याच काळात भारतात समाजवादी विचारांचा प्रसार होत होता. श्रमजिवी वर्गाचे शोषण संपुष्ठात यावे आणि सामाजिक संपत्तीचा विनियोग समाजाच्या कल्याणासाठी व्हावा. यादृष्टीने उत्पादन साधने सामाजिक मालकीची असणे आवश्यक आहे. अशी समाजवादी विचारसरणी होती. समाजवाद्यांचे मार्ग जरी गांधींना पसंत नसले तरी विशिष्ट परिस्थितीत उत्पादन साधनांची राष्ट्रीयीकरण करावे लागेल. हे गांधींना ही मान्य करावे लागेल. प्रांतीक पातळीवर स्वकीय सरकारी १९३७ नंतर अधिकारपदी आली.

विश्वस्त कल्पनेबाबत आप-आपसात चर्चा करून गांधींचे सहकारी किशोरीलाल मश्रुवाला, नरहरी पारेख आणि प्रा. दातवाला यांनी ही संकल्पना स्पष्ट करण्याच्या हेतूने एक मसुदा १९४२ साली स्थानबध्द असताना तयार केला. गांधींनी त्याच्या मनाप्रमाणे त्यात फेरफार केल्यानंतर त्यांनी जी योजना प्रसिध्द केली तिचे स्वरुप पुढीलप्रमाणे आहे. १. विश्वस्तवृत्ती हे आधुनिक भांडवलदारी समाज व्यवस्थेत परिवर्तन घडवून आणून समतावादी तत्वावर तिची पुनर्घटना करण्याचे एक साधन आहे. भांडवदारीला तिच्यात मुळीच थारा नाही. परंतु सध्याच्या भांडवदार वर्गाला स्वत:ची सुधारणा करण्याची, तिच्या मार्फत संधी दिली जाईल. मानवी स्वभावात परिवर्तन घडून येणे मुळीच अशक्य नाही. अशा श्रध्देतून या विश्वस्त वृत्तीच्या संकल्पनेचा उगम झालेला आहे. २. संपत्तीच्या खाजगी मालकीचा हक्क आम्ही मानीत नाही. समाज स्वत:च्या कल्याणासाठी जरूर तेथे खाजगी मालकीला परवानगी देईल. ३ संपत्तीची मालकी आणि वापर यावर कायदेशीर बंधने घालणे आम्ही वर्ज्य मानीत नाही. ४. शासन नियंत्रित विश्वस्तवृत्तीमध्ये कोणाही व्यक्तीला समाजाच्या हिताकडे दुर्लक्ष करून केवळ स्वत:च्या समाधानासाठी संपत्तीचा विनीयोग करण्याचे किंवा तिचा साठा करण्याचे स्वातंत्र्य राहणार नाही. ५. ज्याप्रमाणे कामगारांना जिवनावश्यक किमान वेतन ठरविण्यात यावे असा प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे समाजातील कोणाही व्यक्तीचे कमाल उत्पन्न किती असावे यावर ही मर्यादा घालणे आवश्यक आहे. अशा प्रकारे किमान आणि कमाल उत्पन्नातील भेद वाजवी व मर्यादीत असावा. आणि हळूहळू हा भेद नष्ट करणे हे उद्दिटे ठेवून त्यानुसार वेळोवेळी ह्या मर्यादामध्ये फेरफार करण्यात यावा. ६. गांधीप्रणीत अर्थव्यवस्थेत उत्पादनाची स्वरूप वैयक्तिक प्रेरणा किंवा लोभ याने न ठरता सामाजिक गरजानुसार ठरविले जाईल. वरील गांधींजींची योजना सेमिनार ऑन दी कॉट्रिब्युशन ऑफ गांधीयन आऊटलुक अँड टेक्निक्स मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशन - गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, १९५३ पान नं ४२१ वर सांगितले आहे.

## सन्दर्भ ग्रन्थ

१. सत्याग्रही समाजवाद - आचार्य जावडेकर निवडक लेखसंग्रह २. गांधी : कार्य व विचारप्रणाली - निर्मलकुमार बोस ३. गांधी नलीनी पंडीत ४. गांधी विचारदर्शन : खंडतेरावा कार्यकारण - गांधी वाड्मय प्रकाशन समिती पुणे संपा. व अनु. - दा. न. शिबीरे ५. गांधी दर्शन कातगडे पुंडलीक अरूण प्रकाशन मुंबई ७. गांधीजीचे बृध्द आत्मचरित्र - शंकरदेव-सुलभ ग्रंथमाला.